# मुंबई विद्यापीठ

आस्थापना १ व ३

क्र.इएसटी/आयसीसी/२०२०-२१/ ९

३० जुन , २०२०

संदर्भः- मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक REG/ICD/2019-20/C-4

**परिपत्रकः-**

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरुन मुंबई विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/ कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या Mission Begin Again या संकल्पनेनुसार मुंबई विद्यापीठाचे सर्व विभागांचे कामकाज सुरु झाले आहे.

मुंबई विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कोव्हीड -१९ च्या काळात आपापल्या विभागात काम करत असताना आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी खालील बाबींची दक्षता घेणे आवश्यक आहे.

१. सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येतांना किमान दोन मास्क स्वतः बरोबर ठेवावेत.
२. सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येताना प्रवेश व्दारावर सुरक्षा विभागाकडून तापमान तपासुनच कार्यालयात यावे.
३. आपल्यासोबत एक ड्रेसही असावा जेणेकरून आपल्याला कपडे कार्यालयात आल्यावर बदलण्याचा पर्याय उपलब्ध राहील. कारण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने येत असताना जर आपण कोणाच्याही संपर्कात आलो असू आणि जर आपल्या हातावर, कपड्यावर विषाणू असतील तर त्याचा संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.
४. एक पिशवी असावी ज्यामध्ये वापरलेले मास्क आणि कपडे वेगळे ठेवता येतील. आपण वापरलेले मास्क, हॅन्ड ग्लोज इ. इतरत्र टाकु नये.
५. हातमोज्यांचा एक जोड बरोबर ठेवावा.
६. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने प्रवास करत असताना तोंडाला मास्क, केसांना रुमाल आणि हातात मोजे घालावेत. कार्यालयात आल्यानंतर आपल्याबरोबरच्या वेगळ्या पिशवीत हे सर्व काढून ठेवावेत. मग आपले हात, तोंड आणि शरीराचा इतर उघडा भाग साबणाने स्वच्छ धुवावा. तोपर्यंत आपले नाक, तोंड आणि डोळे यांना स्पर्श टाळावा.
७. सॅनिटायझरचा वापर वेळोवेळी करण्यात यावा.
८. आपले टेबल, संगणक आणि इतर सामग्रीचीही अशीच स्वच्छता करावी आणि मग स्वतः चे हात परत स्वच्छ धुवून मग कामास सुरुवात करावी.
९. आपापल्या कार्यालयात कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था करताना त्यांच्यामध्ये किमान ६ फुटांचे अंतर असणे गरजेचे आहे जेणेकरुन दोन कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षीत अंतर राखता येईल. जर अश्या प्रकारची व्यवस्था करणे शक्य होत नसेल तर फोर्ट परिसरातील विभागांनी सामान्य प्रशासन विभाग, फोर्ट आणि विद्यानगरी परिसरातील विभागांनी सामान्य प्रशासन विभाग, विद्यानगरी यांच्याशी संपर्क साधावा.

१०. बाहेरचे पदार्थ शक्यतो खाऊ नये. घरून आणलेला डबा सुद्धा शक्य असल्यास स्वच्छ चमच्याचा वापर करून खावा.

११. मास्क हा वारंवार घाल-काढ करू नये आणि त्याच्या वरच्या बाजूस सारखा हात लावू नये. मास्क हे नाक, तोंड पूर्णपणे झाकले जातील अशा पद्धतीने घालावेत. मास्क हे कापडी घ्यावे म्हणजे ते स्वच्छ धुवून परत वापरता येतील. कोणत्याही सार्वजनिक गोष्टीला जसे की दरवाजा, नळ, स्वच्छतागृह यांचा वापर केल्यास किंवा स्पर्श केल्यास लगेचच हात धुवावेत.

१२. सकाळी येताना वापरलेला मास्क परत वापरू नये. संध्याकाळी जाताना नवीन मास्क लावावा. घरी गेल्यावर घराच्या आत जाताना शक्य असल्यास बाहेरच हात आणि पाय साबणाने स्वच्छ धुवावेत आणि थेट बाथरूममध्ये जाऊन अंघोळ करावी. आपले कपडे पाण्यात वॉशिंग पावडर घालून भिजत टाकावेत.

१३. बाहेरून घेतलेली कोणतीही गोष्ट किमान 2 दिवस घराच्या एका कोपऱ्यात तशीच ठेवून द्यावी व दोन दिवसांनंतर त्यांचा वापर करावा. जर लगेचच एखादी गोष्ट वापरावयाची असले तर तिला क्लिनिकल स्पिरिटने कापसाच्या साहाय्याने पुसून घ्यावे आणि मगच वापरावी.

प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

drive/Dipak/Circular (Mar)